# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.06.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आज दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम.
2. रामसर वारसास्थळांच्या यादीत आणखी दोन पाणथळ प्रदेशांचा समावेश.
3. संसदेचं पावसाळी अधिवेशन 21 जुलैपासून सुरू.
4. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी दीर्घ चर्चा, मात्र रशिया-युक्रेनमध्ये तातडीनं शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता धूसर असल्याचं पुतिनं यांचं स्पष्टीकरण.
5. सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं भारतात गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन आणि
6. फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या एकेरीत नोवाक जोकोविच, जॅनिक सिनर आणि कार्लोसर अल्कराझ आणि लोरेंझो मुसेट्टी, तर महिला कोको गॉफ, लुईस बॉईसन, आर्यना साबालेंका आणि इगा स्वितेक यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<u>मोदी वृक्षारोपण</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत भगवान महावीर वनस्थळी उद्यानात होणाऱ्या विशेष वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होणार आहेत. एक पेड मां के नाम या उपक्रमाचा भाग म्हणून ही मोहीम होत आहे. अरावली हरित भिंत प्रकल्पाचा ती भाग आहे. सातशे किलोमीटरच्या अरावली पर्वतरांगांमध्ये पुनर्वनीकरणाचा तो भाग आहे.

**<u>मोदी जम्मू</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या कटरा इथं बहुप्रतीक्षित रेल्वे सेवांचं उद्घाटन करणार आहेत. वैष्णो देवी बेस कॅंपपासून बारामुल्लापर्यंत वंदे भारत रेल्वे सुरू होणार आहे. त्यामुळे जम्मू ते श्रीनगर दरम्यान थेट रेल्वेसेवा पहिल्यांदाच सुरू होत आहे. पंतप्रधान अंजी खेड या जगातल्या सर्वांत उंचावरच्या रेल्वे पुलाचंही उद्घाटन करणार आहेत. या कार्यक्रमसाठी सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे

**<u>रामसर वारसास्थळ</u>**

रामसर वारसास्थळांच्या यादीत आणखी दोन पाणथळ प्रदेशांचा समावेश झाला आहे. राजस्थानमधील फलोदीमधील खिचन आणि उदयपूरमधील मीनार या स्थळांचा यादीत समावेश झाला आहे. त्यामुळे या यादीतील स्थळांची संख्या 91 वर गेली आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनं देशात सुरू असलेल्या प्रगतीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात गौरवोद्गार काढले आहेत. जनतेच्या सहभागातील पर्यावरण जनजागृतीबाबत अतिशय उत्साहात उपक्रम राबवले जात असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पाणथळ प्रदेशांची संख्या वाढवणं हा रामसळ वारसास्थळ प्रकल्पाचा उद्देश आहे.

**<u>पर्यावरण दिन</u>**

आज जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण जागृती मोहिमेचा भाग म्हणून 1973 पासून हा दिवस साजरा करण्यात येतो. यंदाच्या पर्यावरण दिनाची संकल्पना प्लॅस्टिक प्रदूषण दूर करू अशी आहे.

**संसद-अधिवेशन**

संसदेचं पावसाळी अधिवेशन 21 जुलैपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनाचं वेळापत्रक सरकारनं काल जाहीर केलं. ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यासाठी संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याच्या विरोधी पक्षांच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बातमीदारांना नवी दिल्लीत सांगितलं. हे अधिवेशन 12 ऑगस्टपर्यंत चालेल.

**जनगणना**

सरकारने ऑक्टोबर 2026 पासून दोन टप्प्यात लोकसंख्या जनगणना-2027 आणि जातींची गणना करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिला टप्पा पुढील वर्षी 1 ऑक्टोबरपासून जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि लडाख या डोंगराळ आणि बर्फाळ भागात राबविला जाईल. दुसरा टप्पा देशाच्या इतर भागांना व्यापणारा 1 मार्च 2027 पासून राबविला जाईल.

**ट्रंप-पुतिन चर्चा**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी काल रात्री दीर्घ चर्चा केली. मात्र, या त्यातून युक्रेनमध्ये तातडीनं शांतता होणार नाही असं पुतिन यांनी मान्य केलं. तसंच युक्रेननं रशियाच्या विमानतळांवर केलेल्या हल्ल्याला रशिया उत्तर देईल असा इशाराही दिला. दोन्ही नेत्यांमध्ये 85 मिनिटं चर्चा झाली. ही चर्चा चांगली झाली, मात्र त्यातून लगेच शांतता प्रस्थापित होणार नाही, असं ट्रम्प यांनीही मान्य केलं. दरम्यान पुतिन यांनी काल सहकारी पक्षांबरोबर झालेल्या एका बैठकीत युक्रेनबरोबर सर्वसमावेशक शस्त्रसंधीची शक्यता फेटाळून लावली आणि अशी शस्त्रसंधी युक्रेनला तयारीसाठी आणखी वेळ देईल असं सांगितलं. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनीही रशियाचा शांतता प्रस्ताव म्हणजे इशाराच असल्याचा दावा केला.

**सरकारची-11-वर्षे**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं भारतानं गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज गेल्या 11 वर्षात सरकारच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करत आहे. यामध्ये आज, कौशल्य विकास आणि रोजगार निर्मिती-भारताची अमृत पीढी, म्हणजे तरुण पिढीला सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्या आवाजातील हा आलेख...

**लोकसंख्येपैकी जवळजवळ 65 टक्के लोक 35 वर्षांपेक्षा कमी वयाचे असल्यानं कौशल्य आणि युवा सक्षमीकरण हे भारताच्या भविष्याची गुरुकिल्ली आहेत. रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना लक्षणीय परिणाम दिसत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नोकरीसाठीची सज्जता सुधारली आहे-2014 मध्ये हे प्रमाण 34% होतं, 2024 मध्ये 51% पेक्षा अधिक आहे. पंतप्रधान कौशल्य विकास योजनेद्वारे गेल्या 10 वर्षांत 1 कोटी 63 लाखांहून अधिक तरुणांना प्रशिक्षित केलं आहे. स्किल इंडिया मिशन, उद्योगाशी संबंधित प्रशिक्षण प्रदान करत आहे, यामध्ये सामायिक कार्यक्षेत्रं म्हणून प्रगत प्रशिक्षण सुविधांचा समावेश आहे, त्यामध्ये लघु आणि मध्यम उद्योग, स्टार्टअप्स आणि उद्योजकांसाठी प्रगत अभियांत्रिकी साधनं, यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे. रोजगाराच्या आघाडीवर, 2022 मध्ये सुरू झालेल्या रोजगार मेळ्याद्वारे 15 राष्ट्रीय कार्यक्रमांतून सुमारे 10 लाख नियुक्ती पत्रं वाटण्यात आली आहेत. दरम्यान, 2017 पासून साडेआठ कोटींहून अधिक लोक EPFO मध्ये सामील झाले आहेत, यामध्ये 2020 पासून 3 कोटी 45 लाख तरुणांचा समावेश आहे. मुद्रा योजनेनं लहान व्यवसायांना सुलभ कर्जासह पाठिंबा दिला आहे. या अंतर्गत, 33 लाख कोटी रुपयांची 6 कोटी 67 लाखांहून अधिक कर्जं मंजूर करण्यात आली. भारत आता जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा स्टार्टअप इकोसिस्टीम आहे. 2016 पासून, स्टार्टअप इंडिया उपक्रमाने 1 लाख 59 हजारांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता दिली आहे, परिणामी 16 लाखांहून अधिक थेट नोकऱ्या निर्माण झाल्या. उल्लेखनीय म्हणजे, यापैकी 73, हजारहून अधिक**

**स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक आहे. कौशल्यं, रोजगारक्षमता आणि उद्योजकता एकत्र येत असताना, एक नवीन पिढी भारताच्या उज्ज्वल भविष्यातील प्रवासाला चालना देत आहे.**

**अयोध्या- प्राणप्रतिष्ठा**

अयोध्येमध्ये श्रीराम मंदिरात राम दरबाराची प्राणप्रतिष्ठा आज होत आहे. भगवान श्रीराम यांची रामराजा या स्वरूपात प्राणप्रतिष्ठा होत आहे. पहिल्या मजल्यावर हा रामदरबार असेल. श्रीरामांबरोबरच लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न माता जानकी, हनुमान यांच्याही मूर्ती या दरबारात असतील.

**हज यात्रा**

सौदी अरेबियात आजपासून हज यात्रा सुरू झाली आहे. भारतासह जगभरातील लाखो भाविक त्यात सहभागी झाले आहेत. आज भाविक मीना शहरातून अराफतच्या दिशेनं रवाना होत आहेत. तिथं ते हज अदा करतील. ते उद्या सकाळी मिनामध्ये परततील.

**रेल्वे ई-आधार**

रेल्वे लवकरच तात्काळ तिकिटांच्या आरक्षणासाठी ई-आधार पडताळणी सुरू करणार आहे. रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनीही माहिती दिली. यामुळे ज्यांना खरंच गरज आहे अशा प्रवाशांना त्याचा उपयोग होईल असं वैष्णव यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**कर्नाटक-चेंगराचेंगरी**

कर्नाटकमध्ये बंगळुरूत चिन्नास्वामी मैदानावर काल झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्यमुखी पडलेल्यांची संख्या 11 वर गेली आहे, तर 33 जण जखमी झाले आहेत. इंडियन प्रीमिअर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा विजय साजरा करण्यासाठी झालेल्या कार्यक्रमात हजारो क्रिकेटप्रेमींनी विविध प्रवेशद्वारांमधून प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यामुळे चेंगराचेंगरी झाली. राष्ट्रपती दौपदी मुर्मू आमि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये भरपाईची घोषणा केली आहे.

**फ्रेंच टेनिस**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या एकेरीत नोवाक जोकोविच, जॅनिक सिनर आणि कार्लोसर अल्कराझ आणि लोरेंझो मुसेट्टी उपांत्य फेरीत पोचले आहेत. पॅरिसमध्ये सुरू असलेल्या या स्पर्देत काल जोकोविचनं जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हचा पराभव केला. तत्पूर्वी जॅनिक सिनरनं कझाकिस्तानच्या अलेक्झांडर बुबलिकचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

महिला एकेरीत काल अमेरिकेच्या कोको गॉफनं मॅडीसन कीजचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर फ्रान्सच्या लुईस बॉईसननं रशियाच्या मिरा अँड्रीवाचा पराभव केला. कोको आणि बॉईसन यांच्यासह आर्यना साबालेंका आणि इगा स्वितेक यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.